# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक ३ जुलै, २०२४

## (सकाळी १०.३० ते ११.१५ वाजता)

**(क) लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (५) ] —**

(१) **ॲड.अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील धारवी येथील QC-१ राजाबली चाळ, टी जंक्शन येथील CTS क्र.३४९ येथे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत वाणिज्यिक गाळ्यांचे बांधकाम करण्यात आल्याचे माहे जून, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेच्या जी-उत्तर प्रभागाने सदरहू अनधिकृत बांधकामा प्रकरणी नियम ३५४ (अ) स्टॉप वर्क नोटिस दिनांक २१ मार्च,२०१८ रोजी संबंधितांना बजावली असल्याचे उघडकीस येणे, सदरहू नोटीशीच्या अनुषंगाने समाधानकारक उत्तर प्राप्त न झाल्याने मुंबई महानगरपालिकेने सदरहू अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याचे आदेश दिनांक १० मे, २०१८ रोजी दिलेले असणे, तथापि निष्कासन आदेश निर्गमित होऊन सहा वर्षाचा कालावधी लोटूनसुध्दा सदरहू अनधिकृत बांधकाम पाडण्याच्या अनुषंगाने कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, सदरहू अनधिकृत गाळ्यांना विद्युत जोडणी मिळावी याकरिता करण्यात आलेल्या अर्जाच्या अनुषंगाने बेस्ट प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे निदर्शनास येणे, सदरहू अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासंदर्भात स्थानिक नगरसेवकाने मुंबई महानगरपालिका प्रशासन तसेच बेस्ट प्रशासनाशी वेळोवेळी पत्रव्यवहार देखील केलेला असणे, तथापि याप्रकरणी संबंधित प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नसणे, याप्रकरणी सखोल चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द

अस्वाक्षरित प्रत

कडक कारवाई करण्याची आवश्यकता तसेच संबंधित गाळे मालकाविरुध्द नियम ४७५ (अ) अन्वये कारवाई करण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्रीमती उमा खापरे**, सर्वश्री प्रसाद लाड, रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली स्फोटाच्या घटनेसह याआधीही विविध जीव घेणाऱ्या घटना जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात घडलेल्या असणे, त्यास आळा घालण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजना हाती घेतल्या जात असणे, त्यामुळे जिल्ह्यात आजही जल, वायू प्रदूषणाला कारणीभूत सुमारे २,२९४ रेड झोन मधील कारखाने नागरिकांच्या जीवावर उठले असल्याची भावना सर्वसामान्यांमधून व्यक्त होत असणे, यामध्ये ठाणे शहर १,०९७ कारखान्यांचा समावेश असल्याचे वास्तव प्रशासनाच्या अहवालावरून उघड होणे, या कारखान्याचा प्रदूषण निर्देशांक ६० टक्के पेक्षा अधिक असणे, यामुळे लोकप्रतिनिधीनी यावर कडक कारवाईचा बडगा उभारण्याची गरज व्यक्त केली असणे, गेल्या वर्षभरात प्रशासनाने पाहणी करून झोन निहाय कारखान्याची नोंद केली असून या धोकादायक असलेल्या रेड झोनसह नारंगी, हिरवा, पांढऱ्या झोनमधील तब्बल ८,७८० कारखान्यांची नोंद आहे त्यात अति धोकादायक म्हणजे ६०% पेक्षा अधिक प्रदूषण निर्देशांक असलेल्या २,२९४ कारखान्यांचा रेड झोन मध्ये समावेश असणे, यामध्ये ठाणे तालुका व शहराच्या परिसरातील सर्वाधिक कारखान्यांची नोंद असणे, यामुळे ठाणे जिल्ह्यातील पर्यावरणाला धोका निर्माण झालेला असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अप्रसिद्ध प्रत

(३) **श्री.विक्रम काळे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे येथील सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडे गांजा व अन्य अंमली पदार्थ सापडल्याच्या घटना वारंवार घडत असणे, त्यातच दिनांक २७ मे, २०२४ रोजी विद्यापीठ वसतीगृहात एका विद्यार्थ्याकडे गांजा हा अंमली पदार्थ सापडणे, त्याप्रकरणी विद्यापीठाने कुलगुरु यांची भेट घेऊन दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (कसबा मतदारसंघ, पुणे) तसेच राजकीय पक्षाचे नेते व कार्यकर्त्यांनी कुलगुरु यांचेकडे करण्यात आलेली असणे, याशिवाय यापुर्वी देखील विद्यापीठातील स्कील डेव्हलपमेंट विभागातील एक विद्यार्थी वसतीगृहात गांजा घेऊन आल्याचे निष्पन्न झालेले असणे, त्याप्रकरणी विद्यापीठाने चौकशी समिती स्थापन करण्यांत येणे, परंतु या घटनेची माहिती पोलिसांना न देता सदर प्रकरण दडपण्याचा झालेला प्रयत्न, परिणामी, विद्यापीठ व शैक्षणिक क्षेत्रात गांजा सारख्या अंमली पदार्थाचा झालेला शिरकाव पाहता, पुणे शहरातील विद्यार्थी, त्यांचे पालक व सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेले असुरक्षिततेचे वातावरण व शासनाप्रति उद्वेगाची भावना, याप्रकरणी सखोल चौकशी करुन दोषींविरूद्ध कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **डॉ.वजाहत मिर्झा**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने वैद्यकीय अभ्यासक्रम पदवी आणि पदवीधर पदवी तसेच पदविका परीक्षांच्या दोन पेपर्सच्या दरम्यान एक दिवसाची सुट्टी दिली जाणार नाही आणि सलग परीक्षा घेण्यात येणार असल्याचे परिपत्रक दिनांक ४ जून, २०२४ रोजी प्रसिद्ध केल्याचे माहे जून, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने घेतलेला हा निर्णय परिक्षार्थी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने गैरसोयीचा आणि विद्यार्थ्यांना तीव्र मानसिक त्रास देणारा असणे, सन २०२३ पर्यंत घेण्यात

अमुद्रित प्रत

आलेल्या वैद्यकीय परीक्षेच्या प्रचलित पद्धतीनुसार घेण्याची मागणी मार्ड या वैद्यकीय क्षेत्रातील निवासी डॉक्टर्स संघटनेने तसेच इतर विद्यार्थी संघटना व परीक्षार्थी विद्यार्थ्यांनीही मागणी केलेली असणे, वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना दोन पेपर्सच्या दरम्यान एक दिवस सुट्टी मिळाल्यास पुढील विषयाच्या पेपरची तयारी व अभ्यास करण्यासाठी कालावधी मिळणे, परंतु सलग परीक्षा घेतल्यास त्याचा विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक अवस्थेवर परिणाम होऊन विद्यार्थी अनुत्तीर्ण होणे, विद्यार्थ्यांचे मानसिक व शारीरिक आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता अधिक असणे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने घेतलेल्या या चुकीच्या निर्णयाचा पुनर्विचार करून वैद्यकीय परिक्षार्थी विद्यार्थ्यांना दोन पेपर्स दरम्यान एक दिवस सुट्टी देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री किरण सरनाईक,** विक्रम काळे, सत्यजीत तांबे, जयंत आसगावकर, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा व वाशिम जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध देयके सन २०२०-२१ पासून प्रलंबित असणे, थकीत देयके पारित होण्यासाठी शिक्षण उपसंचालक तसेच संचालक स्तरावरील मान्यतेची गरज असणे, शिक्षण उपसंचालक कार्यालयात सादर झालेली देयके बऱ्याच वेळेस समान त्रुटीच्या सबबीखाली वारंवार परत येणे, वशिला किंवा लाच दिल्यानंतर प्रस्ताव मंजूर होत असण्याच्या तक्रारी येणे, प्रस्ताव दाखल दिनांकानुसार मंजूरीसाठी न पाठविले जाणे, परिणामी कित्येक प्रस्ताव वर्षानुवर्षे प्रलंबित असणे, त्यामुळे या अनियमिततेला कारणीभूत अधिकारी/कर्मचारी यांची तपासणी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अस्वीकृत

**(सकाळी ११.१५ ते ११.४५ वाजता)**

**(ख) (मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**श्री.प्रविण दरेकर**, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, आमश्या पाडवी, अमोल मिटकरी, चंद्रशेखर बावनकुळे, विक्रम काळे, सतीश चव्हाण, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.राम शिंदे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दटके, रामराव पाटील, रमेश कराड, गोपिचंद पडळकर, वसंत खंडेलवाल, अमरीशभाई पटेल, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेचे कल्याण हे एकमेव ध्येय समोर ठेवून व नारी शक्ती आणि युवा शक्तीला प्राधान्य देऊन "शासन आपल्या दारी" या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्र गतीमान ठेवण्याचा, जनकल्याणाचा वसा घेतलेल्या या शासनाचा प्रयत्न असणे, राज्यात एकीकडे दुष्काळाची होरपळ तर दुसरीकडे वादळी पाऊस, गारपीटीचा कहर सुरु असणे, खरेतर उन्हाळी तसेच रब्बी आणि खरीप अशा तिन्ही हंगामांवर नैसर्गिक आपत्तीनी घाला घातला असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे शेत पिकांचे खुप नुकसान झाले असल्याची वस्तुस्थिती असणे, राज्यात कमी पाऊस असलेल्या आणि जनावरांचा चाऱ्याचा प्रश्न निर्माण झालेल्या राज्यातील १२४५ महसुली मंडळात बारा छावण्या उभारण्यास शासनाने परवानगी दिली असणे, कांद्याला योग्य भाव मिळावा याकरिता कांद्याचे दर ठरविण्याचे अधिकार केंद्राच्या ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वतःकडे ठेवले असणे, स्वर्गीय वसंतराव नाईक शेती स्वावलंबी मिशनला मजबुत करून शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी टास्क फोर्सला बळकट करण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, कापसासाठी ५०० व सोयाबीनसाठी २७० शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असणे, धानाला २० हजार रुपये बोनस देण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा ६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळू शकेल अशी तरतूद करण्यात येणे, शेतकऱ्यांकरिता "नमो

शेतकरी महासन्मान निधी" योजना राबविण्यासाठी ५ हजार ७०० कोटींची तरतूद करून त्याचा पहिला हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झाल्याचे निदर्शनास येणे, नुकसानीचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी ई-पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली असणे, शेतकऱ्यांना दिवसा अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी "मागेल त्याला सौरऊर्जा पंप" उपलब्ध करून देण्याचा शासनाने निर्णय घेतला असणे, केवळ १ रूपयात पिक विमा योजना राबविण्यात येत असल्याने खरीप हंगामासाठी राज्यातील १ कोटी ७० लाख व रब्बी हंगामासाठी ६६ लाख अशा एकूण २ कोटी २३ लाख शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेत विक्रमी सहभाग नोंदविला असल्याचे निदर्शनास येणे, शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता एनडीआरएफच्या दराच्या दुप्पट दराने शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानाकरिता ७,१९६ कोटी रुपये इतका निधी मंजूर केला असणे, कमी पाऊस झालेल्या राज्यातील १,०२१ महसूल मंडळात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर करण्यात येऊन तेथील शेतकऱ्यांना कर्जाचे पुनर्गठन, चालू वीज बिलात ३३.५ टक्के सूट यासारख्या विविध ८ सवलती लागू करण्यात आल्या असल्याचे निदर्शनास येणे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत पहिल्या टप्प्यात ४ हजार कोटी रुपयांचा निधी वाढवून आता ५,४६९ कोटी एवढा करण्यात आला असणे, राज्यात प्रथमच कांदा महाबँक हा पथदर्शी प्रकल्प सुरु करण्यात आला असणे, विदर्भातील नागपूर, काटोल, कळमेश्वर, मोर्शी, बुलढाणा येथे आधुनिक संत्र प्रक्रिया केंद्रे उभारण्याकरिता सुमारे २० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली असल्याचे निदर्शनास येणे, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतील २,१२९ लाभार्थ्यांना ७ कोटी ५१ लाख रुपयांचा निधी दिला असल्याचे निदर्शनास येणे, "मागेल त्याला शेततळे" योजनेचा विस्तार करून मागेल त्याला फळबाग, मागेल त्याला ठिबक व तुषार सिंचन, मागेल त्याला शेततळ्याचे अस्तरीकरण, मागेल त्याला आधुनिक यंत्र, कॉटन श्रेडर इ. देण्याचा निर्णय करुन त्याकरिता १ हजार कोटी यावर्षी खर्च करण्याचा शासनाचा मानस असणे, पारंपारिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेतकरी वर्गाचा आर्थिक आधार बळकट करण्याकरिता मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राज्यात कार्यान्वित केला असणे, त्यायोगे राज्यातील लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेऊन शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी

अप्रकाशित प्रत

शेतकरी ते खरेदीदार अशी मूल्यसाखळी विकसित करणे हा या प्रकल्पाचा उद्देश असणे, कृषी, शिक्षण, संशोधन आणि विद्यापीठांची संरचना आणि कार्यपध्दती अभ्यास करण्यासाठी माजी कुलगुरु डॉ. राजाराम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असणे, राज्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचे प्रस्तावित असून त्यायोगे २ वर्षात ६१ सिंचन प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित असणे, वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प कार्यान्वित केल्याने नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलढाणा जिल्हयातील सुमारे ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणे, जलयुक्त शिवार अभियानांकरिता ६०० कोटी रूपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असणे, स्वच्छ व हरित ऊर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी जनाई-सिरसाई, पुरंदर यांसह सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनाचे सौरउर्जिकरण करण्यात येत असून त्याकरिता ४ हजार २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, म्हैसाळ, (जि.सांगली) येथे पथदर्शी सौरऊर्जा प्रकल्प राबविण्यात आल्याने सांगली आणि सोलापूर जिल्हयातील सुमारे ७५ हजार शेतकरी कुटुंबियांना याचा लाभ मिळाला असणे, कोल्हापूर आणि सांगली जिल्हयातील पुरामुळे होणारी जिवित व वित्तहानी टाळण्याकरिता आणि अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागात वळविण्याकरिता जागतिक बँकेच्या सहाय्याने ३ हजार २०० कोटी रूपये किंमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यात येणे, राज्यात गरजू महिलांना ओळखण्यासाठी व त्यांना सक्षम करण्यासाठी "नारी शक्ती दुत ॲप" हे एक क्रांतिकारी ॲप्लीकेशन राबविण्यात येत असणे, राज्यातील महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन आणि उद्योजकता विकासासाठी सक्षम करण्याकरिता "पंतप्रधान नमो महिला सशक्तीकरण अभियान" राबविण्यात येत असणे, "मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना" राबविण्यात येऊन त्यायोगे २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, "शुभमंगल सामुहिक नोंदणीकृत विवाह" योजनेत लाभार्थी मुलांना देण्यात येणारे अनुदान १० हजार रुपयांवरून २५ हजार रूपये करण्यात येणे, "मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना" या माध्यमातून पात्र कुटुंबाला वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत देण्याचे घोषित करण्यात आले असणे, महिला बचत गटानी उत्पादित केलेल्या वस्तूंना "उमेद मार्ट" आणि "ई-कॉमर्स ऑनलाईन प्लॅटफॉर्म" याद्वारे यावर्षात २५ लाख महिलांना लखपती करण्याचा उद्देश शासनाने ठेवला असणे, सन २०२४-२५

अग्रिम प्रत

या शैक्षणिक वर्षांपासून मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, प्रतिवर्षी १० लाख तरुण-तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण देण्यासाठी "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" राबविण्यात येत असणे, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, कराड, अवसरी खुर्द, जि. पुणे येथील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये "सेंटर ऑफ एक्सलन्स" स्थापन करण्यात येणार असणे, राज्यातील बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत इ. संस्थांमार्फत एकूण २ लाख ५१ हजार ३९३ विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुक प्रशिक्षण देण्यात आले असून त्यायोगे ५२ हजार ४०५ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त झाल्या असणे, महापे, नवी मुंबई येथे २५ एकर जागेवर "इंडिया जंग्स ॲन्ड ज्वेलरी पार्क" उभारून त्यायोगे १ लाख रोजगार निर्मिती करण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, सिंधुदुर्ग जिल्हयात स्थानिकांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा ड्रायव्हिंग केंद्र उभारण्याकरिता २० कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली असणे, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांच्या मुलां-मुलींसाठी ८२ शासकीय वसतीगृहे स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिली असणे, राज्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी शाश्वत पर्यटन धोरण आखण्यात येत असणे, राज्यातील ५० नवीन पर्यटन स्थळांची निवड करून त्या ठिकाणी थीम पार्क, ॲडव्हेंचर स्पोर्ट, शॉपिंग मॉल, वॉटर मॉल आणि निवास व्यवस्था करण्यात येत असणे, बुलढाणा येथील लोणार, अंजिठा-वेरूळ, कळसूबाई, त्र्यंबकेश्वर तसेच कोकणातील सागरी किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येत असणे, सातारा येथील शिवसागर जलाशय, भंडारा येथील गोसीखुर्द जलाशय तसेच जळगाव येथील वाघुर जलाशय येथे नाविन्यपूर्ण जलपर्यटन प्रकल्प राबविण्यात येत असणे, कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी शिवकालीन ३२ गडकिल्ल्यांचे नुतनीकरण व संवर्धन करण्याचे प्रस्तावित असणे, राज्यातील पर्यटकांना व भाविकांना योग्य दरामध्ये उत्तम व सुरक्षित सुविधा पुरविण्यासाठी श्रीनगर, जम्मु काश्मीर आणि अयोध्या येथे महाराष्ट्र भवन बांधण्याचा निर्णय घेतला असणे, छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा राज्याच्या सीमेवर बांधणे, छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखे राज्यात आणणे, बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेमध्ये समाविष्ठ १४० चाचण्यांमध्ये वाढ करणे तसेच, आपला दवाखाना योजनेची व्याप्ती वाढवून ती मुंबईबाहेरही राज्यभर करण्याची आवश्यकता, विकसित

अप्रकाशित प्रत

महाराष्ट्राचा ध्यास घेऊन राज्यात शेतकरी, शेतमजूर, महिला व युवकांना बळकट करण्यासाठी व लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

**दोन** : **अभिनंदनपर प्रस्ताव –**

"वेस्ट इंडिज व अमेरिकेत नुकत्याच पार पडलेल्या नवव्या मर्यादित २० षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत विश्वविजेता ठरल्याबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन करण्याबाबतचा प्रस्ताव"

**तीन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **गृहनिर्माण मंत्री** : "महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**चार** : **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**पाच** : **लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

(१) **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे जोगेश्वरी (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा नियोजन समितीने दिनांक २० ऑगस्ट, २०१८ रोजी मान्यता देणे, तद्नंतर

अस्थायी प्रत

जिल्हा परिषद प्रशासनाने दिनांक १९ जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये बृहत आराखडयात नाव समाविष्ट करण्यासाठीचा प्रस्ताव आरोग्य संचालनालय यांच्याकडे सादर करणे, आरोग्य संचालनालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ अन्वये निकषात बसणारा परिपुर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर केला असणे, नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ३०,००० लोकसंख्येचा निकष असणे, जोगेश्वरी येथील लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ३०,११८ तर आज रोजीची लोकसंख्या ३१,००० व पसिरातील लोकसंख्या ६०,००० असणे, जोगेश्वरी येथे शासकीय जागा असणे, शासकीय निकषानूसार दोन प्राथमिक आरोग्य केंद्राचे अंतर २५ कि.मी.चा निकष असणे, परंतू जवळचे प्राथमिक आरोग्य केंद्र वाळुज हे ९ कि.मी. अंतरावर असणे, तथापि जोगेश्वरी परिसरातील लोकसंख्या मोठया प्रमाणावर असल्यामुळे विशेष बाब म्हणून जोगेश्वरी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यासाठी आरोग्य विभागाने सकारात्मक प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला असणे, त्यास तात्काळ मान्यता देऊन जोगेश्वरी परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, शासनाकडे प्रलंबीत असणाऱ्या प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री.धीरज लिंगाडे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कमी पटसंख्या असणाऱ्या शाळांचे समायोजन करुन समूह शाळा प्रायोगिक तत्वावर सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आल्याचे माहे जून, २०२४ च्या दरम्यान निदर्शनास येणे, जिल्हा परिषद व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा बंद करुन समूह शाळांमध्ये खाजगी शाळांमधील शिक्षणाला महत्व प्राप्त होणार असून गरीबांच्या मुलांना शिक्षण घेणे कठीण होणार असणे, तसेच जवळपास शाळा बंद झाल्यामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांना दहा ते पंधरा किलोमीटर पायपीट करावी लागणार असल्यामुळे या धोरणाबाबत राज्यशासनाने पुर्नविचार करुन गोरगरीब जनतेला, विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सुखकर व्हावे यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

(३) **श्री.सचिन अहिर**, सत्यजीत तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"खाद्य व्यवसाय सुरु करण्यासाठी भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण तसेच अन्न व औषध प्रशासनाकडून खाद्य परवाना घेणे बंधनकारक असून सदरहू खाद्य परवान्यासाठी केंद्र सरकारच्या एफ.एस.एस.ए. च्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक असणे, तथापि बनावट संकेतस्थळांच्या माध्यमातून व्यवसाईकाची फसवणूक होत असल्याचे माहे जून, २०२४ च्या दुसऱ्या आठवडयात निर्देशनास येणे, सदरहू बनावट संकेत स्थळे आणि सरकारी संकेतस्थळे यात साम्य असल्याने सरकारी नियामक प्रक्रियेची विश्वासहर्ता धोक्यात येणे, अशा बनावट संकेत स्थळावर कारवाई करण्याची मागणी ऑल फुड ॲण्ड ड्रग लायसन्स होल्डर फांऊडेशनने वेळोवेळी केली असणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधीतावर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, सदरहू बनावट संकेत स्थळाच्या माध्यमातून एकूण किती परवाने वितरीत करण्यात आले आहे व त्यापैकी किती परवानेधारक अद्याप व्यवसाय करीत आहेत? याची सखोल चौकशी करुन त्यासंदर्भात यथोचित कारवाई करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सोलापुर जिल्ह्यात सुमारे ११० पुनर्वसित गावठाणे असणे, यापैकी काही गावांना अद्यापही महसुली दर्जा मिळालेला नसणे, संबंधित विभागाकडे पुनर्वसित गावांचे नकाशे उपलब्ध नसणे, पुनर्वसन कायद्याअंतर्गत प्रकल्पग्रस्त लोकांचे जीवन सुखकर करण्यासाठी पुनर्वसित गावठाणांना मूलभूत अठरा नागरी सुविधा देय असणे, संबंधित गावांना नागरी सुविधांसाठी एकदाच निधी देण्याची तरतुद असणे, देखभाल दुरुस्तीसाठी निधीची तरतुद नसणे, देय असलेल्या १८ नागरीसुविधांपैकी संबंधित गावांत किमान ११ सुविधा पुर्ण झालेल्या असतील तरच त्याचे जिल्हा परिषद प्रशासनाकडे हस्तांतरण होउन देखभाल दुरुस्ती होत असणे, परंतु बहुतांश पुनर्वसित गावात किमान ११ सुविधा पुर्ण नसणे, तसेच ज्या गावांत ११ नागरी सुविधा पुर्ण आहेत परंतु त्या २५/३० वर्षापुर्वीच्या असल्याने देखभाल दुरुस्ती

अस्वीकृत प्रत

अभावी त्या जीर्ण झालेल्या असणे, परिणामी जिल्हा परिषद प्रशासन हस्तांतरण करुन घेत नसणे, यामुळे पुनर्वसित गावे सुविधांअभावी विकासापासून वंचित राहत असणे, याकडे प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यावर पुनर्वसित गावात देय असलेल्या संपुर्ण नागरिसुविधा त्याचे हस्तांतर, देखभाल दुरुस्ती आणि पुनर्वसित गावातील समस्यांबाबत तातडीने अंमलबजावणी करुन उपाययोजना करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सात : सन २०२४-२०२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा. (दुसरा दिवस)**

**आठ : राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस मुख्यमंत्री यांचे उत्तर.**

**नऊ : शासकीय विधेयक –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

"सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४"

---

**दहा : (शुक्रवार, दिनांक २८ जून, २०२४, शनिवार, दिनांक २९ जून, २०२४, सोमवार, दिनांक १ जुलै, २०२४ व मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील,** शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, अरुण लाड, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, विलास पोतनीस, किरण सरनाईक, सुनिल शिंदे,

असुधारित प्रत

जयंत आसगावकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** –

"राज्यात सततचा पाऊस, नापिकी, दुष्काळ, टंचाई, अवकाळी, कर्जबाजारीपणा, कृषी विभागाच्या अपुऱ्या सोईसुविधा यामुळे शेतकरी संकटात आलेला असणे, परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये झालेली वाढ, शेतमालाला हमीभाव न मिळणे, बियाणे, खते यांच्या दरात झालेली प्रचंड वाढ, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने दुष्काळग्रस्त १०२१ महसूल मंडळांमध्ये सवलती जाहिर करुनही अद्याप शेतकरी वंचित असणे, पीक विम्याचे नियमितपणे हप्ते भरुनही शेतकरी पीक विम्यापासून वंचित राहणे, तथापि, विमा कंपन्या दिवसेंदिवस मालामाल होणे, राज्यात एकीकडे भीषण पाणी टंचाई असताना टँकर माफीयांकडून नागरिकांची होत असलेली लूट, पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी राबविण्यात आलेली "हर घर नल का जल" योजना अपयशी ठरणे, चारा छावण्या उभारण्याबाबत होत असलेले दुर्लक्ष, परिणामी पशुधनाचे झालेले नुकसान, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी संकटात असताना शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याकडे होत असलेले जाणीवपुर्वक दुर्लक्ष, माहे जानेवारी ते मे, २०२४ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप न मिळणे, कांद्यावर निर्यात बंदी असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी शासनाच्या चुकीच्या निर्यात धोरणांमुळे अडचणीत आलेला असणे, शेतकऱ्यांना योग्य तो लाभ मिळण्यासाठी कांदा, सोयाबीन, कपाशी, तूर, हरभरा, भुईमूग, धान, उडीद, मूग, हळद, मिरची इ. पिकांना योग्य तो दर मिळवून देण्यास शासनाला आलेले अपयश, परिणामी शेतकऱ्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, धान, संत्रा उत्पादक शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित असणे, दूध उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने घोषित केलेले अनुदान अद्यापही मिळालेले नसणे, राज्य सरकारने ७५ हजार पद भरती करण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अजूनही पुर्तता केलेली नसणे, त्यामुळे अनेक तरुण-तरुणी रोजगारापासून वंचित असणे, जुन्या पेन्शन योजनेत असलेल्या त्रुटी, शिक्षकांच्या संच मान्यतेमध्ये असलेल्या त्रुटी, शक्तिपीठ महामार्गास शेतकऱ्यांचा विरोध असून प्रकल्प रेटण्याचा सुरु असलेला प्रयत्न, स्मार्ट प्रिपेड योजनेमुळे ठराविक उद्योजकांना फायदा होणार असणे, वीज दरामध्ये झालेली वाढ, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणारी भरती प्रलंबित असणे, महागाईत झालेली वाढ, राज्य शासनामार्फत घेण्यात आलेल्या विविध परिक्षांमध्ये झालेली अनियमितता, तसेच गत दोन वर्षात शासनाच्या विविध विभागामध्ये अनेक भ्रष्टाचार व गैरव्यवहार उघडकीस येणे, कृषी उद्योग विकास महामंडळामध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेला भ्रष्टाचार, मेटाल्डिहाइड

अग्रिम प्रत

कीटकनाशके, कापूस साठवणपिशव्या, फवारणी पंप, डिजिटल मृदा आर्द्रता संवेदक या निविष्ठांच्या खरेदी प्रक्रियेमध्ये झालेला गैरव्यवहार, सेंद्रीय शेतीसाठीचा निधी अधिकाऱ्यांच्या जाणीवपुर्वक दुर्लक्षामुळे अखर्चित राहणे, चंद्रपूरच्या महाऔष्णिक वीज निर्मिती केंद्रात निविदा प्रक्रिया व साहित्य खरेदीत करण्यात आलेला भ्रष्टाचार, आदिवासी विकास विभागात फर्निचर खरेदीमध्ये झालेला कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार, सार्वजनिक आरोग्य विभागात टक्केवारी, वसुली, बदल्या-पदोन्नतीत गैरप्रकार, जेष्ठता डावलून पदस्थापना, औषध खरेदीमध्ये झालेला हजारो कोटींचा गैरव्यवहार, कामगार विभागांतर्गत बांधकाम कामगार मंडळामध्ये विविध योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार, राज्य उत्पादन शुल्क विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार तसेच आकृतीबंध पुनर्रचनेत झालेला गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागामध्ये सुरु असलेला भ्रष्टाचार, महसूल विभागात वाढलेला भ्रष्टाचार व त्यामुळे सर्वसामान्यांची होत असलेली परवड, वाळू धोरण राबविण्यास शासनास आलेले अपयश, त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांची वाळू माफियांकडून होत असलेली फसवणूक, सातारा जिल्ह्यातील झाडाणी, ता. महाबळेश्वर गावात उच्चपदस्थ शासकीय अधिकाऱ्यांसह तेरा जणांनी ६४० एकर जमीनीची अत्यल्प दरात केलेली खरेदी, निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून देणग्या देणाऱ्या कंपन्यांना राज्यातील विविध प्रकल्पांची कोट्यवधी रुपयांची देण्यात आलेली कंत्राट, संचालक, नगररचना, पुणे यांनी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचे योग्य प्रकारे नियोजन न केल्यामुळे हा निधी व्यपगत होणे, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या कालावधीत राजकीय दबावापोटी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार, पाणी पुरवठा विभागात जलजीवन मिशन अंतर्गत कामाचे वाटप करताना ई-निविदा न राबविता केलेला गैरव्यवहार, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**अकरा : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) –**

**(मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक १ व २]**

**(१) सर्वश्री रमेश पाटील,** प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स.**

"**ठाणे जिल्ह्यातील धरणांची कामे प्रलंबित असल्याबाबत** " या

असुधारित प्रत

विषयावरील श्री. रमेश पाटील व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्र. २२१२४ ला दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रसाद लाड, रमेश पाटील, **वि.प.स.**

"**राज्यातील समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम चे लाभ ७ व्या वेतन आयोगानुसार मिळणेबाबत**" या विषयावरील श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांचा दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ४ मधील अतारांकित प्रश्न क्र. १९५९२ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४ रोजीच्या बॅलटमध्ये आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना [अनुक्रमांक क्रमांक ३ व ४]**

(३) **सर्वश्री अभिजित वंजारी,** राजेश राठोड, अशोक जगताप, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात गुंठेवारी कायद्यानुसार नियमितीकरण करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीचा अवलंब करण्यात येऊन त्यातून मालमत्ताधारकांना दिलासा मिळत असल्याचे भासविण्यात येणे, वास्तविक नागपूर सुधार प्रन्यास मध्ये गुंठेवारी नियमितीकरणास अर्ज केले असता त्यावर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने गुंठेवारी नियमितीबाबत आठ आठवडे होऊनही त्याबाबतचा निर्णय नागपूर सुधार प्रन्यासव्दारे केला जात नसणे, नागपूरमधील बाबुलखेडा येथील खसारा क्र.५१/१, ५१/२, मध्ये प्लॉट नं.५९, २५, २३, १७/ए आणि २२ या संपत्तीवरील नियमितीकरणासाठी नागपूर सुधार प्रन्यासकडे दिनांक २८ जुलै, २०११ रोजी अर्ज देऊन अर्ज निकाली काढण्यात न आल्याने अनेक प्रकरणे नागपूर सुधार प्रन्यास मध्ये प्रलंबित असणे, अशी गुंठेवारी नियमितकरणाची प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्यामुळे त्यामध्ये वाद निर्माण होऊन निपटारा करण्यास अडचणी निर्माण होऊन याचिकाधारकांना मा.न्यायालयाकडे दाद मागावी लागणे, परिणामी त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने चौकशी करुन गुंठेवारी नियमितीकरणाबाबत ऑनलाईन प्रक्रिया सुलभ करुन

अग्रिम प्रत

प्रकरणाचा लवकरात लवकर निपटारा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री अरुण लाड,** शशिकांत शिंदे, धीरज लिंगाडे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात गाव तेथे वाचनालय ही चळवळ राबविण्यात आल्यापासून सन १९६७ मधील कायद्यान्वये गावोगावी ग्रंथालये सुरु करण्यात आलेली असणे, गावोगावी असणाऱ्या ब, क व ड वर्गातील ग्रंथालयांमध्ये पुस्तकांची संख्या वाढल्याने ग्रंथालयांचा दर्जा वाढवून मिळण्याकरिता ग्रंथालयांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला असून, शासनस्तरावर सदर प्रस्ताव सन २०१२ पासून प्रलंबित असणे, राज्यातील ११ हजार ६६८ ग्रंथालये क्षमता असूनही वरचा दर्जा मिळत नसल्याने ग्रंथालय सुरु ठेवण्यासाठी त्यांना आर्थिक कसरत करावी लागत असणे, शासनाने या ग्रंथालयांचा दर्जा वाढविण्याकरिता प्रक्रिया राबवावी अशी ग्रंथालय चालकांची मागणी असणे, ग्रामीण भागात असणारी ब, क व ड दर्जाची ग्रंथालये आर्थिक अडचणीत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ जुलै, २०२४

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

अस्वीकृत प्रत